## Dnyandeep Shikshan Prasarak Mandal, Chandrapur

# Dr. Khatri Mahavidyalaya, Tukum Chandrapur

डॉ. खत्री महाविद्यालयात "सायन्स व्हिजन २०२६" चे आयोजन

चंद्रपूर (का.प्र.) :

स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे २८ फेब्रुवारी २०२६ ला "राष्ट्रीय विज्ञान दिन" निमित्य सायन्स व्हिजन २०२६ चे आयोजन करण्यात आले.

सायन्स व्हिजन २०२६ मध्ये रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, मॉडल कॉम्पिटीशन चे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील एकूण ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

या स्पर्धेचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांचे शुभहस्ते झाले. त्या प्रसंगी मंचावर संस्थेचे सचिव डॉ. एस. बी. कपूर, विज्ञान शाखेचे प्रमुख प्रा. आर. के. राजुरकर, डॉ. पि. एम. तेलखडे, डॉ. पी. आर. मोहरकर, डॉ. टि. एम. शेख, डॉ. एम. एस. पॉल, कु. बि. बि. तरफदार उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. जे. एम. काकडे यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की, आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. कौशल्यावर आधारीत उपक्रमा अंतर्गत अश्या प्रकारच्या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक कौशल्याचा विकास होतो. जे त्यांना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी उपयोगी पडते. प्रमुख पाहुणे डॉ. सुशिल कपूर यांनी या कार्यक्रमा निमित्य सर्व स्पर्धकांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

उदघाटन सोहळ्याचे संचालन डॉ. टी. एम. शेख यांनी केले आणि मान्यवरांचे आभार डॉ. (सौ.) एम. एस. पॉल यांनी मानले. हा उपक्रम यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ प्राध्यापकाचे आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.






DR. KHATRI MAHAVIDYALAYA


Department of Physics




SAVE OUR RIVER
PLEASE STOP PLASTIC




IQAC &
EXAM ROOM
NATIONAL
SCIENCE
DAY.


BRANCHES OF SCIENCE


EXAM ROOM
NATIONAL
SCIENCE
DAY.